| | | |
|---|---|---|
| | **<u>जनसंपर्क अधिकारी</u>**<br>**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१**<br>**<u>E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in</u>** | |

प्रेस नोट क्र. ४१७/२०२३ दिनांक ०४/१२/२०२३

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

दिनांक १०-१२-२०२३ रोजी होणा-या वसई-विरार महानगरपालिका मॅरेथॉन स्पर्धासाठी येणा-या स्पर्धकामुळे वाहतुक कोंडी होवु नये याकरीताची वाहतुक नियंत्रण अधिसुचना सोबत जोडुन जोडयात आलेली आहे.

**----0000----**

पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
कार्यालयाचा पत्ता-सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन, मिरा-रोड (पुर्व),
ठाणे.४०११०७ फोन नंबर-०२२-३५००६११६
E-mail:-dcphq.mb-vv@mahapolice.gov.in

जा.क्र.- पोउपआ(मुख्या)/मॅरेथॉन स्पर्धा/वाह./अधिसुचना//२०२३ | ६२१ दिनांक ०४/१२ /२०२३.

**११ वी वसई-विरार महानगरपालीका व वसई तालुका कला क्रिडा मंडळ यांच्या सयुंक्त विद्यमाने राष्ट्रीय वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन स्पर्धासाठी येणा-या स्पर्धकामूळे वाहतूक कोंडी होऊ नये याकरीतावाहतूक नियंत्रण अधिसूचना**

---

**ज्याअर्थी** वसई वाहतूक विभाग, परिमंडळ-१ चे प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी त्यांचेकडील जा. क्र. ६००/२०२३, दि.- ०१/१२/२०२३ अन्वये असे निदर्शनास आणुन दिले आहे की, **११ वी वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन ४२.१९५ किमी व इतर शालेय स्पर्धांचे आयोजन दि. १०/१२/२०२३ रोजी सकाळी ०५.३० वाजले पासून नवीन विवा कॉलेज येथुन होणार आहे.** यामुळे मॅरेथॉन मार्ग ठिकाणी वाहतूक नियोजन न केल्यास मॅरेथॉन स्पर्धेकरिता सहभागी होणा-या स्पर्धाकामूळे स्पर्धा बघण्यासाठी बाहेरुन येणा-यांची गर्दी तसेच त्यांची अस्ताव्यस्त पार्कीग होणारी वाहने यामुळे बाजूचे रस्ते व नाक्यावरील वाहतूक प्रभावीत होऊन मीठया प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे. संभाव्य वाहतूक कोंडी व यामुळे शहरातील वाहन चालक, स्थानीक नागरीक यांना होणारा त्रास, प्रवासाचा विलंब टाळण्यासाठी **वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन ४२.१९५ कि.मी** स्पर्धचे ठिकाणी येणारी वाहने पर्यायी मार्गाने वळवून वाहनांच्या पार्कींगबाबत वाहतूक नियोजन करणे आवश्यक आहे.

**ज्याअर्थी वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन** ४२.१९५ किमी स्पर्धा नवीन विवा कॉलेज या ठिकाणी होणार असून त्याकरीता पुर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.) स्पर्धेचे आयोजन नवीन विवा कॉलेज, विरार (पश्चिम) येथे, **अर्ध मॅरेथॉन (२१.०९५ कि.मी.) स्पर्धेचे आयोजन व्हिक्टर हाईट्स बिल्डींग वसई** (पश्चिम) येथे, ११ कि.मी. मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन नवीन विवा कॉलेज विरार पश्चिम येथुन आयोजित करण्यात आलेले असुन या तीनही मुख्य स्पर्धाच्या व इतर स्पर्धांचा फिनीश पॉईट नवीन विवा कॉलेज असणार आहे. त्या कालावधी करिता सदरचा मार्ग "नो पार्कींग" झोन म्हणून घोषीत करणे व सदर मार्गावरुन येणारी वाहतूक ही पर्यायी मार्गाने वळवणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी** मी प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाचा पोलीस उपायुक्त म्हणून शहरातील रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये व अपघात होऊ नये यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१)(ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

नवीन विवा कॉलेज या ठिकाणी **११ वी वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन** स्पर्धा होणार असून सदर स्पर्धाच्या कालावधीमध्ये वाहतूक कोंडी व अपघात होऊ नये याकरीता स्थानीक नागरीकांची व अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता सर्व वाहनांना **दिनांक- १०/१२/२०२३ रोजीपहाटे ०५.०० वा. ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत खालीलप्रमाणे निर्बंध घालण्यात येत आहेत.**

**सर्वेक्षणाप्रमाणे सार्वजनिक रस्त्यांवर खालील प्रमाणे निर्बंध घालावयाचे आहेत .**

१. **पुर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.)**

पुर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.) स्पर्धा ही नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपतीनगर-जकात नाका-म्हाडारोड वरील नवीन मनपा चौक येथुन यु टर्न-जकात नाका-बोळींजनाका नाका,पाटील आळी,उमराळे चर्च-चक्रेश्वर तलाव-हेगडेवार चौक-समेळपाडा-नालासोपारा रेल्वे ब्रिजवरुन पुर्वकडे आचोळे रोड-बँक ऑफ इंडिया-वसंतनगरी ग्राऊंड-वसंतनगरी सर्कल-वसई स्टेशन रोड-वसई ओव्हर ब्रिजवरुन पश्चिमेकडे-डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (पंचवटी नाका)-अंबाडीरोड-माणिकपुर नाका-वसई माणिकपुररोड-बाभोळा नाका-पापडी नाका-तामतलाव नाका-चिमाजी आप्पा मैदान-जी.जी.कॉलेज-व्हिक्टर हाईट्स-पंचायत समिती रोड-पारनाका-बस डेपो मार्गे-चिमाजी आप्पा मैदान-तामतलाव नाका-पापडीनाका- बाभोळा नाका-माणिकपुर नाका-अंबाडीरोड-डॉ.बाबासाहेब आबेडकर चौक (पंचवटीनाका)-वसई ओव्हर ब्रिजवरुन पुर्वेकडे-वसंतनगरी मेनगेट-वसंतनगरी सर्कल-वसंतनगरी ग्राऊंड-फायर ब्रिगेड स्टेशन-बँक ऑफ इंडिया-आचोळे रोड पुर्व-नालासोपारा रेल्वे ब्रिजवरुन पश्चिमेकडे-समेळपाडा-हेगडेवार चौक-चक्रेश्वर तलाव-उमराळे चर्च-पाटील आळी-बोळींजनाका-गोकुळ टाऊनशिप-मुलजीभाई मेहता स्कुल-राजीव चौकातुन उजवीकडे-विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरुपती नगर-नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

२. **अर्ध मॅरेथॉन (२१ कि.मी.)**

अर्ध मॅरेथॉन (२१ कि.मी.) स्पर्धा हा रुट व्हिक्टर हाईट्स परिसर-पंचायत समिती रोड-पारनाका-वसई बस डेपो मार्ग-तामतलाव नाका-पापडीनाका-वसई स्टेशनरोड-बाभोळा नाका-वसई माणिकपुर नाका-नवघर अंबाडी रोड पोलीस चौकी-अंबाडी रोड-डॉ.बाबासाहेब आबेडकर चौक (पंचवटीनाका)-वसई ओव्हर ब्रिजवरुन पुर्वेकडे-वसंतनगरी मेनगेट-वसंतनगरी सर्कल-वसंतनगरी ग्राऊंड-फायर ब्रिगेड स्टेशन-बँक ऑफ इंडिया-आचोळे रोड पुर्व-नालासोपारा रेल्वे ब्रिजवरुन पश्चिमेकडे-समेळपाडा-हेगडेवार चौक-चक्रेश्वर तलाव-उमराळे चर्च-पाटील आळी-बोळींजनाका-गोकुळ टाऊनशिप-मुलजीभाई मेहता स्कुल-राजीव चौकातुन उजवीकडे-विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरुपती नगर-नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

३. **११ कि.मी.स्पर्धा-**

११ कि.मी.स्पर्धा हि रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपतीनगर-जकातनाका-बोळींजनाका, पाटील आळी-उमराळे चर्च-चकेश्वर तलाव येथुन यु टर्न-उमराळे चर्च-पाटील आळी-बोळींज नाका-गोकुळ टाऊनशिप-मुलजीभाई मेहता स्कुल-राजीव चौकातुन उजवीकडे-विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरुपतीनगर-नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

४. **५ कि.मी.स्पर्धा-**

५ कि.मी.स्पर्धा ही रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपतीनगर-जकातनाका-बोळींजनाका-(व्दारका स्विट) येथुन यु टर्न-गोकुळ टाऊनशिप-मुलजीभाई मेहता स्कुल-राजीव चौकातुन उजवीकडे-विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरुपतीनगर-नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

## पालघर जिल्हा मर्यादित व शालेय गटातील स्पर्धा-

५. **११ कि.मी.स्पर्धा (पालघर जिल्हा मर्यादीत)**

११ कि.मी. स्पर्धा (पालघर जिल्हा मर्यादीत) याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपती नगर-जकात नाका-बोळींजनाका-पाटील आळी-उमराळे चर्च-चकेश्वर तलाव येथुन यु-टर्न-उमराळे चर्च- पाटील आळी-बोळींजनाका-गोकुळ टाऊनशिप-मुलजीभाई मेहता स्कुल-राजीव चौकातुन उजवीकडे- विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरुपतीनगर-नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

६. **७ कि.मी. (पालघर जिल्हा मर्यादीत)**

७ कि.मी.शालेय स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन महिपाल मेडीकल-विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरुपती नगर)-बंजारा हॉटेल-कॅनरा बँक-जुने विवा कॉलेज रोड-मॅक्डोनाल्ड-कॉसमॉस बँके पासुन उजवीकडे वळुन समोरील सरकल वरुन डावीकडे टर्न-फॅन्टसी केक शॉपपासुन डावीकडे-अव्हेन्यु आय समोरुन जे.एन.बी.टेरडर्स पासुन उजवीकडे-सिध्दीविनायक मंदिर-रुस्तमजीस्कुल-नारंगी बिट चौकी पासुन यु टर्न-रुस्तमजी स्कुल-सिध्दीविनायक मंदिर-जेएनबी टरडर्स पासुन डावीकडे-फॅन्टसी केक-कॉस मॉस बँक-मॅक्डोनल्डस-मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

७. **५ कि.मी. (शालेय स्पर्धा)**

५ कि.मी. शालेय स्पर्धा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन महिपाल मेडीकल-विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरुपती नगर)-बंजारा हॉटेल-कॅनरा बँक-जुने विवा कॉलेज रोड-मॅक्डोनाल्डस-कॉसमॉस बँके पासुन उजवीकडे वळुन समोरील सरकलवरुन डावीकडे टर्न-फॅन्टसी केक शॉपपासुन यु टर्न-कॉसमॉस बँक- मॅक्डोनाल्डस-आगरी चौक-मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

८. **३ कि.मी. (शालेय स्पर्धा)**

३ कि.मी.शालेय स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन महिपाल मेडीकल-विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरुपतीनगर)-बंजारा हॉटेल-कॅनरा बँक-जुने विवा कॉलेज रोड-मॅक्डोनाल्डस पासुन यु टर्न-आगरी चौक-मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट पर्यंत असा असणार आहे.

९. **२ कि.मी. (शालेय स्पर्धा)**

२ कि.मी.शालेय स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन महिपाल मेडीकल-विजय वल्लभ हॉस्पीटल (तिरुपतीनगर)-बंजारा हॉटेल-कॅनरा बँक-जुने विवा कॉलेजरोड-हॉटेल हवेली पासुन यु टर्न-मनी गोपाळ बिल्डींगसमोरील बधाई स्वीट चौक पर्यंत असा असणार आहे.

१०. **पर्यायी मार्ग-**

आगाशी,अर्नाळा,नंदाखाल,सत्पाळा या बाजुकडुन येणारी वाहने विरार रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी पर्यायी मार्ग

१. बोळींज सिडीकेट बँक पासुन डाव्या हाताला वळुन पदमावती नगर मार्गे रानपाडा,पाण्याचा तलाव,विनय विनीत मार्गे,जकात नाक्यावरुन रेल्वे स्टेशनकडे.

२. विनय विनीक पासुन डाव्या बाजुला वळुन नविन विवा कॉलेजच्या पाठीमागुन वाय.के.नगर एन.एक्स. मार्गे नारंगी रेल्वे फाटक मार्गे हायवेकडे जाण्यासाठी

३. मुंबई बाजुकडुन वसई बाजुकडे येण्यासाठी बाफाणे ते नायगाव, वसई पापडी/वसई बस डेपो

४. मुंबई बाजुकडुन वसई बाजुकडे येण्यासाठी बाफाणे ते वसई पुर्व एम.आय.डी.मार्ग वसई पुर्व रेल्वे स्टेशनकडे

५. मुंबई-अहमदाबाद बाजुकडुन वसई बाजुकडे येण्यासाठी बाफाणे ते मधुबन

६. मुंबई-अहमदाबाद बाजुकडुन वसई बाजुकडे येण्या-या वाहनांसाठी बाफाणा फाटा ते नायगाव पुर्वे कडुन नायगाव प. मार्गे उमेळमान, माणिकपुर नाका, पापडी, दत्ताणी, स्टेला पेट्रोल पंप

७. वसई गाव ते पारनाका मार्गे भुईगाव मार्गे, सनसीटी, १०० फुट रोड, अंबाडी रोड पर्यंत

८. वसई प. स्टेशन ते आनंद नगर मार्गे नवपाडा, उमेळमान, नायगाव मार्गे पापडी वसईगाव तसेच नायगाव ब्रिज मार्गे मुंबई अहमदाबाद हायवेकडे जातील.

सदर वाहन चालकांना पर्यायी मार्गाबाबत मार्गदर्शन फलक तसेच चिन्ह दाखविणारे बॅनर लावण्यात येणार आहेत.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना मी प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार आज दिनांक- ०४/१२/२०२३ रोजी माझ्या सही शिक्यानिशी जाहीर करत आहे.

पोलीस उप आयुक्त (मुख्या.) मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय सत्यमेव जयते

Psw-d

( **प्रकाश गायकवाड** )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईंदर, वसई-विरार

**आवश्यक कार्यवाहीकरीता प्रत-**

१. सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक व तुळींज,वसई मिरा-भाईंदर, वसई-विरार
२. कार्यकारी अभियंता, वसई विरार महानगरपालीका, वेगमर्यादा, रस्ता बंद व पर्यायी मार्ग दाखवणारे फलक लावून घेणेबाबत.
३. प्रभारी अधिकारी वसई /विरार वाहतूक विभाग, प्रभारी अधिकारी- वसई, माणिकपुर, आचोळे, तुळींज, नालासोपारा,अर्नाळा,विरार पोलीस ठाणे योग्य बंदोबस्त नेमण्यासाठी.
४. जनसंपर्क अधिकारी, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय (अधिसूचना प्रसिध्दीसाठी)
५. व्यवस्थापक - टीएमटी, व्हीव्हीएमसी बसेस, ठाणे राज्य परिवहन बस सेवा
६. सर्व रिक्षा युनीयन अध्यक्ष – वसई-विरार शहर
७. अध्यक्ष - टेम्पो चालक / मालक संघटना, वसई-विरार

**प्रत सस्नेह अग्रेषित –**

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ व ३, मिरा-भाईंदर वसई-विरार

**प्रत माहितीस्तव सविनय सादर –**

१. मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
२. मा. अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
३. मा. जिल्हाधिकारी, पालघर
४. मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका